## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

क्र. कोविमं/ माध्य./ परीक्षा /431
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक २३.०६.२०२१

प्रति,

१. विभागीय माहिती उपसंचालक,
माहिती उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर
२. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी
जिल्हा माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर
३. मा. संचालक
आकाशवाणी केंद्र, सातारा/सांगली/कोल्हापूर
४. व्यवस्थापक
रेडिओ मिरची व टोमॅटो एफ एम; कोल्हापूर
५. मा. संचालक, बी न्यूज, कोल्हापूर
६. मा. वृत्तपत्र संपादक, दैनिक. पुढारी/सकाळ/तरूणभारत/लोकमत/लोकसत्ता/पुण्यनगरी/महाराष्ट्र टाईम्स/टाईम्स ऑफ इंडिसा सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय :- जानेवारी, २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी मूल्यमापनाचा निकाल जाहीर करणेबाबत.

महोदय,

जानेवारी २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी मूल्यमापनाचा निकाल जाहीर करणेबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी त्यांच्या वृत्तपत्रात/प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी , ही विनंती .

( देविदास कुलाळ )
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहितीसाठी :-
मुक्त विद्यालय संपर्क केंद्र , सातारा,सांगली ,कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय : जानेवारी, २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वीच्या व्दितीय बॅचच्या मूल्यमापनाचा निकाल जाहीर करणेबाबत

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक व लातूर या सात विभागीय मंडळांमार्फत इयत्ता ५ वी (प्राथमिक स्तर) व इयत्ता ८ वी (उच्च प्राथमिक स्तर) मध्ये प्रविष्ठ व्दितीय बॅचच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दिनांक ०१ जानेवारी, २०२१ ते १० जानेवारी, २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. त्या मूल्यमापनाचा ऑनलाईन निकाल www.msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर सोमवार दिनांक २८/०६/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची विषयनिहाय श्रेणी दर्शविण्यात येत आहे. विद्यार्थ्याला सदर माहितीची प्रत (Printout) घेता येईल. पात्र विद्यार्थ्यांना त्यांनी इयत्ता ५ वी/इयत्ता ८ वी पर्यंतची अर्हता व विद्याविषयक कौशल्य प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र यथावकाश वितरित करण्यात येईल.

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ,पुणे.